या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १ जून २०२४ | अंक१७४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# पंकजा मुंडे पडणार, रावसाहेब दानवेंचा बदला परमेश्वर घेणार; चंद्रकांत खैरे यांचे मोठमोठे दावे

**कोणता पक्ष सत्तेवर बसणार याचं चित्र मंगळवारी दुपारपर्यंत स्पष्ट होईल. त्यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.**

## जलील पडणार

जलील पडणार इम्तियाज जलील यावेळी निवडून येणार नाही. मुस्लिम समाज आमच्याकडे आला आहे. त्यामुळे जलील यांचं मतदान घटलं आहे. वंचित बहुजन आघाडी त्यांच्यासोबत नव्हती. त्यामुळे वंचितचा फटका जलील यांना बसणार आहे. ते निवडून येणं शक्यच नाही, असा दावाही त्यांनी केला

लोकसभा निवडणुकीच्या निकालाला अवघे पाच दिवस बाकी असताना दावे प्रतिदावे करणं सुरू झालं आहे. प्रत्येक उमेदवार मीच जिंकून येणार असा दावा करत आहे. तसेच आपल्याच अलायन्सला अधिक जागा मिळतील असाही दावा करत आहे. पण ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी मात्र वेगळाच दावा केला आहे. या निवडणुकीत भाजप उमेदवार पंकजा मुंडे आणि रावसाहेब दानवे पडणार असल्याचा दावा चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. खैरे यांच्या या दाव्यामुळे आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. मीडियाशी संवाद साधताना त्यांनी हा दावा केला आहे.महाविकास आघाडीला राज्यात 32 जागा मिळतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संपले आहेत. मराठवाड्यात महायुतीला एकही जागा



मिळणार नाही. रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे पडणार आहेत. परमेश्वर रावसाहेब दानवे यांचा बदला घेणार आहे, असा दावा चंद्रकांत खैरे यांनी केला आहे.

ओव्हर कॉन्फिडन्स नको निवडणूक निकाल म्हटल्यावर धाकधूक होतेच. शाळेत असताना परीक्षेच्यावेळीही धाकधूक व्हायची. पेपर सोपा गेला की बरं वाटायचं. आताही पेपर सोपा गेला आहे. पण ओव्हर कॉन्फिडन्समध्ये राहून चालणार नाही. कारण शेवटी मतदारांच्या हातात कौल आहे, असं चंद्रकांत खैरे म्हणाले. दीड लाख मताधिक्य कसं शक्य आहे? मी एक ते दीड लाखांचं मताधिक्य घेऊन विजयी होणार आहे, असा दावा संदीपान भुमरे यांनी केला आहे. भुमरे यांच्या या दाव्यावरही त्यांनी टीका केली. भुमरेंनी ईव्हीएम मशीन बदलल्या आहेत काय? एक लाखाचं मताधिक्य घेऊन निवडून येणं कसं शक्य आहे? असा सवाल त्यांनी केला. यावेळी हिंदू मते तर मिळणारच आहे. पण 22 टक्के मुस्लिम मतेही मला मिळणार आहे, असा दावा त्यांनी केला.

## मंगळवेढा आगारात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी...



**मंगळवेढा प्रतिनिधी**

दिनांक ३१ मे २०२४ रोजी राज्य परिवहन मंगळवेढा आगारामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आगार व्यवस्थापक संजय भोसले, स्थानक प्रमुख शरद वाघमारे वाहतूक निरीक्षक योगेश गवळी वाहतूक नियंत्रक संतोष चव्हाण, वरिष्ठ लिपिक अमोल काळे, सचिन माने तसेच वाहक आबासो होवाळ, अमोल बड्डे, सचिन रायबान, गणेश गवळी, चालक शांताराम दुधाळ अरुण तोंडसे,अनिल बेदरे,सूर्यकांत क्षीरसागर हे देखील उपस्थित होते

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पुरस्कार सोहळा अन्नदान व साड्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न

**बुलंद छावा पुरस्काराने घोलप, सुखवसे,उगले सन्मानित**

**बीड प्रतिनिधी**

बीड- छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त शुक्रवार दि.31मे रोजी जिव्हाळा बेघर केंद्र नवी भाजी मंडई बीड येथे अन्नदान व गरजू महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बुलंद छावा समाजरत्न पुरस्काराचे वितरीत करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष 9 वे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावर्षी नवी भाजी मंडई बीड येथील जिव्हाळा बेघर



केंद्रामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके, गणेश नाईकवाडे, राष्ट्रीय छावाचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के, भ्रष्टाचार निर्मूलन समिती जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे, संभाजी सेनेचे जिल्हाध्यक्ष भरत वालेकर दै. झुंजार नेता चे पत्रकार बळीराम भोसले ॲड. दिनेश नाटकर आदी उपस्थित होते.

छत्रपती शंभूराजे जयंतीनिमित्त यावर्षीचा बुलंद छावाचा पुरस्कार ॲड. संतोष घोलप, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अशोक सुखवसे शिव व्याख्यानकार आर आर उगले यांना प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमात पुरस्कार वितरित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन बुलंद छावा चे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांनी केले बुलंद छावाचे पदाधिकारी नारायण गवते आजिनाथ आदमाने, जीवन धांडे, विजय पवार यांनी परिश्रम घेतले . या कार्यक्रमात शंभू प्रेमी उपस्थित होते.

## पैठणला दुचाकी स्वारांचा धुमाकूळ

**पैठण प्रतिनिधी**

पैठण शहरात दुचाकी स्वारांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. वाहतूक पोलिसांचा धाक नसल्याने वारकरी पर्यटक व पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे .तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज बाहेरगावच्या लोकांचा कायम राबता असतो. शहरातील दुचाकी स्वारांवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. अल्पवयीन मुले भर बाजारपेठेतून धूम स्टाईल गाड्या पळवतात .बेसूर व कर्णकर्कश हॉर्न तसेच चित्रविचित्र नंबर प्लेट धारक दुचाकी यांना तर अटकावच नाही. त्यातच तीस ते पस्तीस टक्के दुचाकी ट्रिपल सीट धावत असल्याने वयोवृद्ध वारकऱ्यांना मात्र जीव मुठीत घेऊन चालावे लागते. विशेष म्हणजे सर्व चौकात वाहतूक पोलिसांची अनुपस्थिती असते. परिणामी तीर्थक्षेत्र असलेल्या या शहरातील वाहतूक व्यवस्थेचा बोजवाडा उडाला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाराणा प्रताप चौक,राजे संभाजी चौक,व खंडोबा चौक या मुख्य ठिकाणांसह नाथ मंदिर यात्रा मैदान आणि नाका टू नाका मार्गावर दुचाकी स्वारांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. वाहतूक पोलिसांचा धाक नसल्याने पादचारी ,वारकरी, पर्यटकांची मोठी कुचंबणा होत आहे .पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी वाहतूक पोलिसांची स्वतंत्र पथके तैनात करून कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## फेजिवडे विद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

माध्यमिक विद्यालय फेजिवडे शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल १०० % निकालाची परपंरा कायम राखली आहे. गुणवंत विद्यार्थी असे जिक्रा राउत -९०.८० % प्रथम क्रमांक,स्वालिहा नावळेकर -९० % द्वितीय क्रमांकचंदना डवर -८५.८० %सुजल कांबळे -८५.४० %सायली भेंडे -८५.४० %सौरभ थोरबोले -८४.२० %मिसबा नावळेकर -८३.६० %सौरभ सोनार -८१.२० %अलिया लांजेकर - ८१.२%सलिना लांजेकर -८०.८० %सुमेध कांबळे -८०.२० %सुजाता गुरव -८० %गायत्री पाटील -८० % शाळेतील १९ विद्यार्थी डीस्तींगशन मधे पास झाले आहेत. या सर्व विद्यार्थाना संस्था अध्यक्ष श्री नंदकुमार पाटील सचिव श्री विलास पाटील मुख्याध्यापक श्री डी. एस. एरुडकर श्री पाटील पी एस, श्री पाटील ए .एम., सौ निऊंगरे आर. आर. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले

## सोशल मिडीयातून वाढत्या गुन्हेगारीला रोखण्यासाठी प्रशिक्षण कमिटी स्थापन करा:- अशोक सुरवसे

**बीड प्रतिनिधी**

-मागील काही दिवसांपासून राज्यात आणि विशेषतः मागास अशी ओळख असलेल्या बीड जिल्ह्यात जाती-पातीचे टोकाचे राजकारण होत असून लोकांचे मन यामुळे दुभांगले आहेत समोर अनेक दुष्काळ, बेरोजगारी असे ज्वलंत प्रश्न असतांना देखील उठ-सुठ सोशलमिडीयावर पोस्ट कर आणि प्रसिद्धी मिळव याकरिता आटापिटा काहीजण करत आहेत त्यामुळे सोशल मिडीयातून वाढत्या गुन्हेगारीला रोखण्यासाठी प्रशिक्षण कमिटी स्थापन करा अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक सुरवसे यांनी निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षक यांना दिले आहे. यामध्ये सोशल मिडीयामुळे हा वाद जास्तच चिघळतांना दिसून येतोय कुणाच्या भावना दुखावल्यामुळे घरामध्ये, दोन समाजामध्ये भांडणे होणार नाहीत याची कोणीही काळजी घेत नाही,सामाजिक विषयांवरती लिहिण्यासारखे अनेक विषय किंवा दुष्काळ, महागाई, बेरोजगारी यासारखे ज्वलंत प्रश्न समोर उभे असतांना, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे म्हणून काही ठरवायचं काही बोलायचं काळजी घेण्याऐवजी उलट चित्र दिसते, मी एखाद्या व्यक्तीच्या विरोधात प्रक्षोभकपणे बोललो म्हणजे मी प्रसिद्धीस येईल यासाठी अनेक व्यक्ती सोशल मिडीयातून पोस्ट करत असतांना पहायला मिळते. याचे कारण या लोकांना पोलीस प्रशासनाची, कायद्याची भिती अथवा महत्व वाटत नसावं. व्हाह्ट्सअप,फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम, ट्विटरसह सोशेल मिडीयाच्या माध्यमातून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह व्हिडिओ,संदेश,अश्लील कॉमेन्ट्स जाणीवपूर्वक या माध्यमातून प्रसार करतांना सर्रासपणे दररोज दिसत आहे. याचाच काही गैरफायदा म्हणून हूशार व्यक्ती व्हाट्सअप ग्रुप मधून विनाकारण




काही तरी कारनाणे आमंत्रित करून तेथील फोटो व्हिडिओ रिल्स बनवून व्हायरल करणे,असे कार्यक्रम आयोजीत करून ग्रुप मधील अनेक सदस्यांना याचे फायदे तोटे माहित नसतात मित्र परिवार म्हणून काही लोक सोशेल मिडीयाचे ज्ञान नसणारे भावनेच्या भरात यांच्या कृत्यात सहभागी होतात व दुष्कर्म करणारे लोक यात यशस्वी होऊन जाणीवपूर्वक या सर्व गोष्टी करत आहेत की काय?असा प्रश्न पडतो. या सर्व गोष्टींचा गैरफायदा घेऊन सोशेल मिडीयाच्या माध्यमातून घरा-घरा मध्ये जाऊन दोन नवरा बायको चे भांडणे घडून आणण्यासाठी व त्यांचे संसार मोडून नाते संबध तोडण्याचे काम काही या हूशार व्यक्ती करतात की काय,? त्याकरिता जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने सोशल मिडीयातून द्वेष तेढ निर्माण करणाऱ्या लोकांवरती कठोर कारवाई करावी.अशा अनेक प्रश्नाचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकुर यांना दिले. यावेळी मनसे सहकार सेना जिल्हा अध्यक्ष अशोक सुरवसे, मनसेचे तालुका अध्यक्ष श्रीकृष्ण,शेतकरी सेना जिअध्यक्ष रामेश्वर साळुंके,शहर अध्यक्ष करण लोंढे,शहर सचिव ओम पालवे,परमेश्वर सपकाळ,विशाल शिंदे,बालाजी काटे,विशाल गायके,व सर्व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## कविता

# अहिल्याबाई होळकर....!

एक उत्तम प्रशासक
अहिल्याबाई होळकर
रणरागिणी त्या होत्या
चालवी तरबेज तलवार...१

इंदूरच्या राज्यकरत्या
राज्य तलवार धाकेवर
रयतेसाठी त्या झटल्या
राज्य केले त्या मनांवर...२

राज्य सुखसोयीने व
भरभराटीने साकारले
कमतरता न ठेवता
संपन्नतेने ते सजवले...३

जागोजागी बांधल्या
पाणपोई व धर्मशाळा
सर्वांगी विकासासाठी
जिव आटापिटा केला...४

त्यानी एक घडविला
सुवर्णमय इतिहास
त्यांच्या कर्तृत्वाचा
कोण करील उपहास...५

सुरेश शिर्के
खारघर,पनवेल

# ०५ बुलेट मोटारसायकलसह एकुण १० मोटारसायकल चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडुन जेरबंद १३,७०,०००/- रुपये किमतीच्या मोटारसायकली हस्तगत

**संतोष औताडे अहमदनगर प्रतिनिधी**

प्रस्तुत बातमीची हकिगत अशी की, अहमदनगर जिल्ह्यामध्ये मोटारसायकल चोरीच्या वारंवार घटना घडत असल्याने मा. श्री. राकेश ओला साहेब, पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी पोनि/श्री. दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना अहमदनगर जिल्ह्यातील मोटारसायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशित केले होते.

नमुद आदेशान्वये पोनि/श्री. दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार बापुसाहेब फोलाणे, रविंद्र कर्डीले, फुरकान शेख, रोहित मिसाळ, भाऊसाहेब काळे, आकाश काळे, विशाल तनपुरे, अमोल कोतकर, संतोष खैरे, उमाकांत गावडे, संभाजी कोतकर यांचे पथक नेमुन गुन्हे उघडकिस आणणे बाबत सुचना दिल्या होत्या.

सदर सुचना प्रमाणे पथक अहमदनगर जिल्ह्यामधील मोटारसायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढत असतांना दिनांक 30/05/2024 रोजी पोनि श्री दिनेश आहेर स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना गुप्त बातमीदारामार्फत तीन इसम चोरीचे विनानंबरचे एच. एफ. डिलक्स मोटारसायकलवरुन श्रीगोंदा बायपास येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोनि श्री दिनेश आहेर यांनी प्राप्त माहिती पथकास कळवुन कारवाई करणेबात सुचना दिल्या होत्या. सदर सुचनांप्रमाणे पथकाने तात्काळ श्रीगोंदा बायपास या ठिकाणी सापळा लावुन थांबले असता बातमीतील नमुद इसम एका विनानंबरचे एच.एफ. डिलक्स मोटारसायकलवरुन येतांना दिसल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांची नावे 1) अनिल मोतीराम आल्हाट वय - 23 वर्षे रा. श्रीगोंदा, 2) हर्षद किरण ताम्हाणे वय - 18 वर्षे रा. श्रीगोंदा, 3) निखील उद्धव घोडके वय -18 वर्षे रा. श्रीगोंदा जि.अहमदनगर असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे मिळुन आलेल्या विनानंबरचे मोटारसायकलबाबत त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस करता त्यांनी सदरची मोटारसायकल चोरी करुन आणलेली असल्याचे सांगितले. त्यानुसार ताब्यातील आरोपींकडे त्यांनी आणखी इतर मोटारसायकल चोरी केल्या आहेत काय याबाबत तपास करता त्यांचेकडुन खालीलप्रमाणे 13,70,000/- रुपये किमतीच्या ताब्यातील आरोपीकडुन अहमदनगर व ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे 1) अनिल मोतीराम आल्हाट वय - 23 वर्षे रा. श्रीगोंदा, 2) हर्षद किरण ताम्हाणे



वय - 18 वर्षे रा. श्रीगोंदा, 3) निखील उद्धव घोडके वय -18 वर्षे रा. श्रीगोंदा जि.अहमदनगर यांना तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. 188/2024 भादवि कलम 379 प्रमाणे या गुन्ह्याचे तपासकामी तोफखाना पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले असुन पुढील तपास तोफखाना पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदर आरोपींकडुन आणखी मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदरची कारवाई मा. श्री. राकेश ओला सो. पोलीस अधीक्षक, अहमदनगर, मा. श्री. प्रशांत खैरे साहेब, अपर पोलीस अधिक्षक, अहमदनगर, मा. श्री. अमोल भारती साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर शहर विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

10 मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

| अ.नं. | मोटार सायकल कंपनी | चेसी नंबर | इंजिन नंबर |
|---|---|---|---|
| 1 | हिरो कंपनीची एच. एफ. डिलक्स | MBLHA11EPB9F01107 | HA11EDB9F03313 |
| 2 | रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट | ME3U3K5C0BK095361 | U3K5COBK095361 |
| 3 | रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट | ME3U3S5C1EL113159 | U3S5C0EL577952 |
| 4 | रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट | ME3U3S5C1HC824089 | U3S5C1HC501875 |
| 5 | रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट | ME3U3S5C0EE461890 | U3S5C0EE461890 |
| 6 | रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट | ME3U3S5C2KM786323 | U3S5C2KM723181 |
| 7 | सुझुकी ॲक्सेस | MB8DP11ABK8B83804 | AF216037408 |
| 8 | यामाहा कंपनीची सॅल्युटो | ME1RE1228F0014068 | E3P1E0035869 |
| 9 | हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर | 04L16F44312 | 04L15E43460 |
| 10 | होंडा कंपनीचे युनिकॉर्न | ME4KC315HKA123592 | KC31EA1123621 |

पुणे जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीचे खालीलप्रमाणे 07 गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| 1. | तोफखाना | 188/2024 भादवि कलम 379 |
| 2 | नगर तालुका | 345/2024 भादवि कलम 379 |
| 3 | नगर तालुका | 433/2024 भादवि कलम 379 |
| 4 | कर्जत | 352/2024 भादवि कलम 379 |
| 5 | कर्जत | 353/2024 भादवि कलम 379 |
| 6 | लोणीकंद, पुणे | 452/2024 भादवि कलम 379 |
| 7 | विश्रांतवाडी, पुणे | 93/2024 भादवि कलम 379 |

# लिंबागणेश येथे कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर जयंती साजरी ; शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती श्लोकांना विरोध हिच खरी आदरांजली:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथे आज दि.३१ मे शुक्रवार रोजी कर्मयोगीनी पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांची त्रिशताब्दी जयंती ग्रामपंचायत कार्यालय येथे माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी अहिल्यामाता यांचा जीवनपट उलगडून सांगताना अहिल्यामाता यांच्या शासन व्यवस्थेच्या कालावधीत अनेक धार्मिक स्थळांचा जिर्णोद्धार केला.धर्मशाळा रस्ते, दवाखाना यांची निर्मिती करताना वस्तुशिल्पी, शिल्पकार, गवंडी, लोहार, सुतार,सोनार, चर्मकार अशा अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना मदतीचा हात देताना करवसुलीची मर्यादा निश्चित ठरवून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना जादा शेतसारा द्यावा लागत नसे.शेती पुर्णतः पाण्यावर अवलंबून असल्याने तलाव, विहीर घाट,कुंडाची निर्मिती केली.यावेळी बाळासाहेब मुळे रमेश गायकवाड, समीर शेख,नाना वाणी यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमांचे सुत्रसंचलन बाळासाहेब मुळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले. ग्रामपंचायत कार्यालय ते पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर चौकापर्यंत ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढत अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परीसर दुमदुमला होता.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स.श्रीहरी निर्मळ,दामु थोरात,महादेव कुदळे, अर्जुन घोलप,अशोक जाधव, जीवन मुळे,कल्याण




वाणी, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, भालचंद्र गिरे, अँड.गणेश वाणी, सुखदेव वाणी,गणपत तागड, संतोष भोसले,रामदास मुळे, शिवाजी वाणी,दादा गायकवाड ,संजय घोलप, सुरेश ढवळे,संदिप मुळे,नवनाथ मुळे,श्याम गिरे, विशाल लगास,शहादेव धलपे , रामकिसन गहिरे,शुभम कोकाटे, विनायक वाणी,सुदाम गिरे, रामचंद्र गिरे, चंद्रकांत आवसरे आदि ग्रामस्थ उपस्थित होते. शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती श्लोकांना विरोध हिच खरी अहिल्यामातेला आदरांजली:- डॉ.गणेश ढवळे अहिल्यामाता होळकर यांनी राज्यकारभार चालवताना अनिष्ट रूढी , समाजविघातक परंपरा यांना पायबंद घातला. सती प्रथा बालविवाह ,केशवपन या अनिष्ट प्रथा त्यांनी बंद केल्या.त्यासाठी कठोर कायदे करून अंमलबजावणी केली अहिल्यादेवींच्या विचारांचा आणि कार्याचा दैदिप्यमान वारसा सांभाळत वाटचाल करताना ज्या मनुस्मृतीत बहुजण समाजावर आणि महिलांवर अन्याय करणारे श्लोक आहेत ज्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले होते त्या मनुस्मृतीच्या श्लोकांचा महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट करण्यात यावेत या प्रस्तावाला कडाडून विरोध करणे हिच पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन केले. डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

# घोटभर पाण्यासाठी महिलांची जीवघेणी कसरत.

**नासिक प्रतिनिधी**

नासिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खरंबापाडा येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी जीवघेणी कसरत करावी लागत आहे. तरीही गढूळ पाणी मिळत असल्याने महिलांकडून संताप व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे खरंबापाडा येथील विहीर कधीही आटत नाही , अशी परिस्थिती असताना ग्रामपंचायतीच्या कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांनी विहिरीतील पाण्याचा उपसा केल्यामुळे गावासह परिसरातील गावांना पिण्याच्या



पाण्याची टंचाई भासू लागली आहे. दरवर्षी उन्हाळ्यात ज्या विहिरीवर पिण्याच्या पाण्याची मदार असते त्याच विहिरीतील पाणी काढून घेतल्याने ग्रामस्थांचे पाण्यामुळे अतोनात हाल होत आहेत. गाळ मिश्रित पाणी मिळत असल्याने पोटाची विकार होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीच्या कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांनी गरज नसताना विहिरीतील पाण्याचा उपसा केला या प्रकरणी यांच्या बाबत चौकशी करावी अशी मागणी जनतेकडून केली जात आहे. पिण्याच्या पाण्यासाठी केली जाणारी महिलांची धडपड अंगावर काटा आणणारी आहे.

# पावसाळ्यात आपत्ती आल्यास फोन कुठे कराल ?, एमएमआरडीएचे टोल फ्रि नंबर

**मुंबई प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्सूनच्या पार्श्वभुमीवर आपत्कालिन नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. सदर नियंत्रण कक्ष 24 तास कार्यरत असणार आहे. या कक्षाच्या माध्यमातून नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निरसन आणि निवारण करण्यासाठी नियंत्रण कक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था इत्यादी विविध आपत्ती नियंत्रण संस्थांशी समन्वय साधण्यात येणार आहे. एमएमआरडीएने स्थापन केलेला नियंत्रण कक्ष 1 जून ते 15 ऑक्टोबर 2024 या कालावधीत कार्यरत असणार असून नागरीक 022-26591241, 022-26594176, 8657402090आणि 1800228801 ( टोल फ्री ) या हेल्पलाईन क्रमांकांच्या माध्यमातून संपर्क साधू शकतात.

# पाटोदा येथील संत तुकाराम महाराज विद्यालयाने एसएससी निकालाची परंपरा कायम

पाटोदा येथील ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापु यांच्या संस्थेचे संत तुकाराम महाराज विद्यालय पाटोदा या विद्यालयाने एस.एस. सी. परीक्षा मार्च २०२४ परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. दहावी निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवत विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे. संस्कृतीची जपवणुक व संस्कारा बरोबरच विद्यार्थ्यांना विविध विषयावर प्रबोधन देणारे संत तुकाराम महाराज विद्यालय या विद्यालयाने निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत पाटोदा शहरात सर्वाधिक निकाल लावत प्रथम क्रमांक मिळविला आहे. या शाळेतून गुणवत्ते बरोबरच संस्कार व विविध विषयावर प्रबोधन केले जाते. पाटोदा येथील संत तुकाराम महाराज विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला प्रथम गवळी पतंजली अरूण - ९९.२० टक्के, द्वितीय - गवळी वेदांत अरुण ९७.२० टक्के, तृतीय - रंधवे ऋषिकेश दत्तात्रय ९५.२० टक्के, ९० टक्के पेक्षा जास्त ९ विद्यार्थी, ८५ टक्के पेक्षा जास्त पुढील विद्यार्थी - भोसले संस्कृती शिवाजी ९३.८० टक्के, ढोले वैष्णवी महादेव ९३ टक्के, तिपटे वैष्णवी हनुमान ९२.८० टक्के, ढाकणे अभिषेक अशोक ९१.२० टक्के, राऊत गीतांजली मारुती ९१.२० टक्के,



राजगुरू सानिका संभाजी ९१ टक्के, नागरगोजे योगेश रामराव ९०.४० टक्के, जायभाय वैष्णवी अण्णा ९०.४० टक्के, राऊत सिद्धि विष्णू ९० टक्के, भोसले मयूर ज्ञानेश्वर ८९.८० टक्के, नागरगोजे ओमकार विठ्ठल ८९.६० टक्के, मोमीन हामजा सिराज ८८.८० टक्के, जायभाय दर्शन सुधाकर ८८.६० टक्के, राऊत रोशन साधू ८७.८० टक्के, पाटील गणेश श्रीहरी ८७.२० टक्के, गीते प्रतीक बाळु ८७.६० टक्के, राऊत आदित्य ज्ञानेश्वर ८७.८० टक्के गुण मिळविले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू, सचिव . अरुण गवळी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश गवळी व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केलं पाटोदा येथील हामेद चाऊस यांचा मुलगा आलान चाऊस यांन 85 टक्के मार्क घेऊन यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक ह भ प रंधवे महाराज तसेच शाळेचे मुख्याध्यापक रंधवे सर गवळी सर आलान चाऊस चा सत्कार केला यावेळी संस्थेमार्फत ह भ प रधवे महाराज यांनी पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# विनायकराव पाटील हायस्कूल चा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल 93.20 टक्के

परिते ता.माढा येथील विनायकराव पाटील हायस्कूलचा दहावी परीक्षेचा निकाल ९३.२० लागला यामध्ये सार्थक संतोष माळी यांने ९१.२०% मिळून त्याने प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक संकेत संतोष भोसले ८८.६०% तृतीय समीक्षा सुधाकर लामकाने ८६.८० % मिळवले यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवराव चव्हाण व मुख्याध्यापक मोहन ढेरे सर तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

# पिंपळवंडी ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**पिंपळवंडी प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती साजरी करण्यात आली. प्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंचपती निलेश मोरे,उपसरपंच दादासाहेब पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,शिवसेना उबाठा उपतालुकाप्रमुख अशोक पवार तसेच माजी उपसरपंच दादासाहेब पवार,पवळ पोस्टमास्तर, भारत पवार,सतीश पवार,बिबीशन पवार, सत्यवान जाधव, श्रीकांत उकांडे,ज्ञानेश्वर शिंदे,महादेव शिंदे,विकास पवार आदी उपस्थित होते.

# साबला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली .

**केज । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली . यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती जनाबाई नरहरी काकडे सरपंच साबला . व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . या नंतर महाराष्ट्र शासन , महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन - २०२३-२०२४ सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन आपला ग्रामपंचायत स्तरीय " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार " श्रीमती कलावती हनुमंत नाईकनवरे माजी सरपंच साबला व श्रीमती दैवशाला पांडुरंग काकडे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती . जनाबाई नरहरी काकडे सरपंच साबला . प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित ग्रामविकास अधिकारी श्रीमान धनराज सोनवणे तसेच ग्रामपंचायत सदस्या श्रीमती आशाबाई श्रीमंत काकडे , श्रीमती प्रतिभा पोपट काकडे , श्रीमती पार्वती महादेव नाईकनवरे , श्रीमान ज्ञानेश्वर श्रीकृष्ण पांचाळ



, श्रीमान पवन राजेंद्र सरवदे उपसरपंच साबला . यांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला .

या कार्यक्रमास उपस्थित आदर्श शिक्षक नरहरी शहाजी काकडे , पोपट विश्वांभर काकडे , राहुल गुलाब मुळे , ईश्वर पांडुरंग काकडे , काशिनाथ गोवर्धन नाईकनवरे , अंकुश पांडुरंग काकडे , आश्रुबा जनार्धन नाईकनवरे , वसंत महादेव नाईकनवरे उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी धनराज सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक नरहरी शहाजी काकडे यांनी केले .

# व्ही. डी. बनसोडे पाटबंधारे खात्यातून सेवानिवृत्त

**प्रतिनिधि/केज**

तालुक्यातील कानडी माळी येथील रहिवासी मागच्या काही वर्षांपासून पुणे येथील सिंचन भवन येथे शाखा अभियंता म्हणून कार्यरत असलेले विठ्ठल दामोदर बनसोडे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. कार्यालयाच्या वतीने त्यांचा हृदय सत्कार करून निरोप देण्यात आला.

विठ्ठल दामोदर बनसोडे मागच्या ३८ वर्षांपूर्वी पाटबंधारे खात्यात रुजू झाले होते. अनेक वर्षे केज, अंबाजोगाई आणि फलटण येथे सेवा केल्यानंतर



त्यांची बदली पुणे येथील सिंचन भवन येथे झाली होती. पुणे येथे त्यांच्याकडे खडकवासला पाटबंधारे विभागात मालमत्ता विभागाची जबाबदारी होती. तिथेही अगदी चोखपणे आपले कर्तव्य बजावल्यानंतर दि. ३१ मे रोजी ते सेवानिवृत्त झाले.

दरम्यान सिंचन भवन कार्यालयात त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांचा हृदय सत्कार करून सेवेतून निरोप देण्यात आला. या प्रसंगी खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाची उपस्थिती होती.

# भाजपचे आमदार नितेश राणे यांनी एक मोठा दावा केला आहे.

राणे यांच्या या दाव्याने खळबळ उडाली आहे. काँग्रेसमध्ये फूट पडलेली आहे. 4 जूननंतर काँग्रेसचे अनेक बडे नेते भाजपमध्ये येणार आहेत. त्यात विजय वडेट्टीवार यांचंही नाव असेल. 4 जूननंतर भाजपवासी होण्याची वडेट्टीवार यांनी तयारी करावी. वडेट्टीवार जिथून निवडून येतात तिथूनच महायुतीचा उमेदवार निवडून येणार आहे, असा गौप्यस्फोट नितेश राणे यांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात आम्हाला काँग्रेसमधील अदृश्यशक्तींनी मदत केलीय, असा दावाही नितेश राणे यांनी केला आहे. ते मीडियाशी संवाद साधत होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार १ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# सरकारला घरचा आहेर देणाऱ्या छगन भुजबळांच्या मनात नेमकं काय?

**मुंबई /प्रतिनिधि**

अजित पवारांचे मंत्री छगन भुजबळांच्या मनात नेमकं काय, हे सध्या भाजपच्या नेत्यांनाही समजत नाही. त्याचं कारण आहे, भुजबळांच्या रोखठोक आणि सत्ताधाऱ्यांच्याच विरोधातल्या काही भूमिका. गेल्या काही दिवसांतल्या भुजबळांच्या भूमिका पाहिल्या तर भुजबळांच्या मनात नेमकं काय चाललंय असा प्रश्न पडतो. छगन भुजबळ त्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. छगन भुजबळ यांनी घेतलेल्या भूमिका पहिली भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या



फोटोच्या अपमानावरुन शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाडांवर सत्ताधारी तुटून पडले. पण फोटो फाडल्याची कृती अनावधानानं घडल्याचं सांगत भुजबळ आव्हाडांच्या पाठीशी उभे राहिले. आपण नाराज नाही हे सांगताच मला जे पटत नाही ते बोलणारच. आणि लोकसभेची जागा नाकारली तर राज्यसभेचं काय घेवून बसलात, असं भुजबळ म्हणाले आहेत. तिसरी भूमिका आहे कांद्यावरुन. केंद्र सरकारनं कर्नाटकच्या बंगलोर रोझ कांदा निर्यातीवरील निर्यातशुल्क हटवलं. पण महाराष्ट्रातील कांदा निर्यातीवर 40 % निर्यात शुल्क कायम ठेवलं. त्यावरुन भुजबळांनी सरकारला घरचा आहेर दिला. गुजरात आणि कर्नाटकच्या कांद्यासाठी वेगळी भूमिका, मग महाराष्ट्राच्या शेतकऱ्यावर अन्याय का ? असा सवाल भुजबळांनी केलाय. चौथी भूमिका आहे, भाजपच्या 400 पारच्या नाऱ्यामुळं संविधान बदलणार हा मेसेज खोलवर गेला आणि त्यामुळं महाराष्ट्रात वेगळा फरक पडला असं भुजबळ म्हणाले. पाचवी भूमिका आहे, विधानसभेच्या जागा वाटपावरुन लोकसभेसारखी खटपट नको. भाजपनं दिलेल्या आश्वासनाप्रमाणं 80-90 जागा मिळाव्यात, असं भाजपला भुजबळांनी सूचित केलं. आव्हाडांची घेतली बाजू मनुस्मृती जाळताना घडलेल्या कृतीवरुन भुजबळांनी पुन्हा एकदा आव्हाडांची बाजू घेतली. त्यावरुन अजित पवार गटाच्या 2 मंत्र्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरु झाली. भुजबळांनी आव्हाडांची बाजू घेणं दुर्दैवी असल्याचं मुश्रीफ म्हणाले. तर आधी मनुस्मृती जाळा मग आव्हाडांवर टीका करा, असा निशाणा भुजबळांनी साधला. सडेतोड आणि आक्रमकतेसाठी भुजबळ ओळखले जातात. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर भुजबळ, शरद पवारांना सोडून अजित पवारांसोबत आले. मात्र 3 पक्षांचं सरकार असतानाही भुजबळ, त्यांना जे वाटतंय ते रोखठोकपणे बोलून जात आहेत. लोकसभा निवडणुकीआधी अजित पवारांच्या गटातून निलेश लंके शरद पवारांकडे परतले. आता तसंच सूचकपणे शरद पवार गटाच्या प्रवक्त्या विद्या चव्हाण बोलल्या आहेत.

## अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल पोलिसांच्या ताब्यात, क्राईम ब्रांचची कारवाई



पुण्यातील कल्याणीनगर येथील हिट अँड रन केसप्रकरणातील मोठी घडामोड समोर आली आहे. या अपघातास जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन आरोपीची आई आता पोलिसांच्या ताब्यात आहे. अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल हिला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ब्लड सॅम्पल बदलल्याप्रकरणी शिवानी अग्रवाल हिला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. क्राईम ब्रांचच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. यामुळे अग्रवाल कुटुंबाभोवतीचा फास आवळला जात आहे. याप्रकरणी अल्पवयीन आरोपी, त्याचे वडील विशाल अग्रवाल आणि आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांना आधीच पोलिसांनी अटक केली आहे. आता त्याची आईदेखील पोलिसांच्या ताब्यात असून तिची कसून चौकशी करण्यात येणार आहे.

## पंकजाताई आमदार किंवा खासदार झाल्याशिवाय पायात चप्पल न घालण्याचा ज्ञानोबा बडेंचा संकल्प.

**किल्ले धारूर प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे या आमदार किंवा खासदार व्हाव्यात यासाठी आपण पायात चप्पल अथवा बुट घालणार नसल्याचा संकल्प ज्ञानोबा बडे यांनी केला असून, नवरात्र उत्सवापासुन ते आजपर्यंत ते अनवाणी पायाने फिरत असुन ज्यावेळी ताई साहेब खासदार होतील. तेव्हाच पायात चप्पल घालणार असल्याचा संकल्प भाजप युवा मोर्चाचे धारूर तालुका उपाध्यक्ष , कासारी ग्रा. पं. व सेवा सोसायटीचे सदस्य ज्ञानोबा बडे यांनी केला आहे. ताई आता खासदार होणारच असल्याचा ठाम विश्वास व्यक्त करत, आपण ताईच्या उपस्थितीतच चप्पल घालणार असल्याचेही ज्ञानोबा बडे यांनी म्हटले. तेलगाव पासून जवळच असलेल्या कासारी (बो.) ता. धारूर येथील रहिवाशी व कासारी ग्राम पंचायत सदस्य व सेवा सोसायटीचे सदस्य तथा धारूर तालुका भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष ज्ञानोबा बडे हे कासारीचे भूमिपुत्र स्व. महादेव अण्णा बडे यांचे कट्टर समर्थक असुन, ते भाजपात असल्याने हेही प्रथम पासुनच भाजपचे व मुंडे घराण्याचे कट्टर समर्थक आहेत. ते पंकजाताई मुंडे यांचे कट्टर भक्त म्हणुन परिसरात ओळखले जातात. गत विधानसभा निवडणुकीत ताई पराभूत झाल्या. त्यामुळे गेल्या पाच वर्षात पंकजाताई यांच्याकडे कोणतेही पद नाही. त्यामुळे पंकजाताई या आमदार किंवा खासदार व्हाव्यात.अशी प्रार्थना नवरात्र उत्सवात ज्ञानोबा बडेंनी आई तुळजाभवानी चरणी केली. जो पर्यंत पंकजाताई या आमदार किंवा खासदार होत नाहीत, तो पर्यंत आपण पायात चप्पल न घालता अनवाणी चालणार असल्याची शपथ ही बडे यांनी घेतली. ज्यावेळी ताई विजयी होऊन, लोकप्रतिनिधी होतील. तेव्हाच आपण पायात चप्पल घालु. अशी अशी ही शपथ त्यांनी घेतली होती. तेव्हा पासुन ते आजतागायत ते अनवाणी पायाने फिरत आहेत. सध्याच्या कडक उन्हाळ्यात ही ते अनवाणी चालत असतात. आपली ही प्रार्थना आई तुळजाभवानी लवकरच पूर्ण करणार असुन, तो दिवस आता कांही तासांवर आला असल्याचे ज्ञानोबा बडे यांनी सांगत, येत्या चार जुन रोजी आपल्या लोकनेत्या पंकजाताई बीड जिल्ह्याच्या खासदार म्हणून विजयी होऊन, लोकसभेत जाणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त करून, त्यानंतर आपण त्यांच्या उपस्थितीतच एक कार्यक्रम घेऊन, त्यात त्यांचा सत्कार करून आपण पायात चप्पल घालणार असल्याचे ज्ञानोबा बडे यांनी म्हटले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त केज येथे रक्तदान शिबीर

केज पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त श्री शनी प्रतिष्ठानआयोजित रक्तदान शिबीर गुरुवार रोजी घेण्यात आले शिबिरात ४१ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. जयंती उत्सव सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. र क्त सं क ल ना सा ठी स्व रा ती अंबाजोगाई येथील रक्तपेढी चे डॉ.रवी गुंडरे,श्री.आनंद सिताप ,नजीर सय्यद ,बाबा शेख,शामली गोबरे आवेज मुस्कान सय्यद आदींनी सहकार्य केले . कार्यक्रमास बाळासाहेब खुणे, अमोल शिंदे,सचिन रोडे,अंगद गाढवे,सूरज करपे,राम डुकरे, अशोक रोडे,संदिप नाईकवाडे, संजय लोंढे, राम गाढवे, तात्या रोडे,संदिप सत्वधर, अमोल रोडे,बबलु रोडे, मनोज कदम, संतोष गाढवे, बापू सत्वधर,पपू सत्वधर, अक्षय सत्वधर, विजय वाकळे, बापू



राऊत,बिरूदेव रोडे, रवि डुकरे, मोनु गाढवे, अमर मुळे, प्रशांत शिंदे, पांडुरंग मुसळे,गणेश घाडगे,जयदेव रोडे,बबलु गायके,नंदु सत्वधर,गणेश रोडे, शैलेश भूतकर, बबलु शिंदे,अण्णा रोडे, माऊली रोडे,आदित्य गायके,गजेंद्र रोडे, मुन्ना गाढवे,सचिन सत्वधर, कृष्णा डुकरे, अक्षय डुकरे,मयूर गुंड, तुषार सत्वधर, नितीन शिंदे, आदींनी उपस्थित राहून रक्तदान केले. शनि प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त रक्तदान

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 299 व्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त होळकर चौक,परळी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये अनेक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला या भागाचे नगरसेवक गोविंद कुकर, बापू बिरू वाटेगावकर सहभाग संस्थेचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करून रक्तदान दान शिवराज सुरुवात झाली. रक्तदानाचा कार्यक्रम घेऊन एक वेगळा पांडा पाडण्याचं काम या भागातील तरुण व नागरिक व सेवाभावी संस्थेने केले आहे. या रक्तदान शिबिरात होळकर चौक परिसरातील गोविंद कुकर, केशव नागरगोजे मुंजा फुके, रामभाऊ कुकर, अमोल सरवदे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कुकर, किशोर सरवदे, मुंजा सरवदे, आधी उपस्थित होते.

## मनुस्मृतीला शालेय पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमात लादण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाहीत-गणेश कवडे

**(पाटोदा प्रतिनिधी)**

अखंड हिंदुस्तानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक नाकारणारी वर्ण व्यवस्था म्हणजे मनुस्मृति ती कदापी शालेय पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करू नये यामुळे आज पाटोदा तहसील कार्यालया समोर शेतकरी नेते गणेश कवडे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला ती मनुस्मृति घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दहन करून शिवाजी महाराजांचे स्वराज्य संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण देशाला बहाल केलं आणि त्याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये अभ्यासक्रमातून मनुस्मृती आणून राज्य शासन नव्याने वर्ण व्यवस्था लादण्याचा प्रयत्न करू पाहत आहे. अभ्यासक्रमात मानवाला जगण्यासाठी घटनेने दिलेले हक्क अधिकार कर्तव्य याबाबत विचार करून तो वयोगटा नुसार अद्याप विद्यार्थ्यांना दिला पाहिजे परंतु राज्य शासनाला राज्यात ही बाब न आणता वर्णव्यवस्था आणून बारा बलुते अठरा आलूते अशी समाज व्यवस्था पुन्हा तयार करण्याची तयारी



करत आहे. असे झाल्यास सरकारच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन येणाऱ्या काळात करण्यात येईल असा निवेदनाद्वारे इशारा दिला. यावेळी या आंदोलनासाठी शेतकरी नेते गणेश कवडे, ज्येष्ठ नेते भाई विष्णुपंत घोलप, इम्रान शेख, विठ्ठल नाईकवाडे,वाहेद भाई पठाण, निलेश जावळे, दिलीपराव गाडेकर,जय जावळे ,रोहन जाधव, नागेश पाटोळे, जाहिद पठाण इत्यादी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. मनुवादी विचारांच्या हातामध्ये सत्ता दिल्याने देशाच वाटोळ झाले आहे पहिल्यापासूनच मनुस्मृति विचाराचे लोक माणसाला माणसापासून दूर करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आता तर हद्दच केली चक्क छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक नाकारणारी वर्णव्यवस्था म्हणजे मनुस्मृती तिलाच आता शालेय पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून विद्यार्थ्यांच्या मनावर मनुस्मृती रुजवण्याचा सुरू केलेला हा हुकूमशाहीचा प्रयत्न त्याला छत्रपती शिवराय, आंबेडकरवादी विचाराचे आम्ही सर्व कदापि सहन करणार नाहीत या मनुवादी विचारांचा डाव हाणून पाडण्यासाठी आम्ही लढा उभा करू आणि लढत राहू असा इशारा गणेश कवडे शेतकरी नेते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com